राज्यातील कृषि विद्यापीठांतर्गत खाजगी संस्थांमार्फत कायम विना अनुदानित तत्वावर चालू असलेल्या २२७ कृषि तंत्र निकेतन (Agriculture Polytechnic) विद्यालयांचा २ वर्षाचा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून ३ वर्षाचा सुरु करण्यास मंजूरी देणेबाबत

महाराष्ट्र शासन
कृषि पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक: मकृप २०१२/प्र.क्र.१०३/७-अे
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक ,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०००३२
दिनांक : २१ जून, २०१२

वाचा: १) महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे पत्र क्रमांक मकृप/शिक्षण-१/३३१२/१२०४, दिनांक ७ जून २०१२
२) शासन निर्णय क्रमांक कृषिवि १२९८/प्रक्र.२३७/२०-ए, दिनांक २६ एप्रिल, २०००
३) शासन निर्णय क्रमांक कृषिवि २००३/प्रक्र.१४५/२०-ए, दिनांक ८ ऑगस्ट, २००३
४) शासन निर्णय क्रमांक मकृवि २०१०/प्रक्र.१५५/७-ए, दिनांक २० ऑक्टोबर, २०११

**प्रस्तावना**

उक्त अनुक्रमांक २ व ३ मध्ये नमूद शासन निर्णयान्वये राज्यातील कृषि विद्यापीठांतर्गत विना-अनुदानित निम्नश्रेणी शैक्षणिक पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा विस्तार करण्यास आणि त्या अनुषंगाने मार्गदर्शक तत्वे आणि निकष विहित करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

२. राज्यातील चारही कृषि विद्यापीठांतर्गत २२७ खाजगी संस्थांमार्फत कायम विनाअनुदानित तत्वावर निम्न कृषि शिक्षणांतर्गत दोन वर्षाचा कृषि तंत्र निकेतन हा पदविका अभ्यासक्रम सद्य:स्थितीत चालू आहे. सदर अभ्यासक्रम उन्नत करुन अर्ध इंग्रजी (Semi English) माध्यमात तीन वर्षाचा कायम विना अनुदानित तत्वावर [कृषि तंत्र निकेतन (Agriculture Polytechnic)] शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून सुरु करण्याचा ठराव महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या कृषि परिषदेच्या दि. १९ एप्रिल, २०१२ रोजी झालेल्या ८६ व्या बैठकीत (ठराव क्र. ०७/८६/२०१२) पारित करण्यात आलेला आहे.त्याअनुषंगाने महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी कृषि तंत्रनिकेतन (Agriculture Polytechnic) हा तीन

वर्ष कालावधीचा पदविका अभ्यासक्रम घटक कृषि तंत्र विद्यालयांमध्ये राबविण्यासाठी उक्त दिनांक ७ जून २०१२ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय**

राज्यात चारही कृषि विद्यापीठांतर्गत २२७ खाजगी कृषितंत्र विद्यालये कायम विना अनुदानित तत्वावर कार्यरत आहेत.यादी सोबत **परिशिष्ट —'ब'** मध्ये जोडण्यात आलेली आहे.

सध्या कार्यरत असलेल्या सदर खाजगी विना अनुदानित कृषि तंत्र निकेतन विद्यालयाकडे पहिल्या व दुस-या वर्षासाठी लागणारे मनुष्यबळ व पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध असल्याने ३ वर्षाचा अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी सद्यस्थितीमध्ये कोणतीही अडचण येणार नाही. त्यामुळे मनुष्यबळ व पायाभूत सुविधांकरीता आर्थिक तरतूदी शिवाय कृषि तंत्र निकेतन सुरु करणे शक्य आहे. सदर पार्श्वभूमीवर राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत येणा-या खाजगी कायम विना अनुदानित तत्वावर कार्यरत असलेल्या खाजगी कृषि तंत्र निकेतन विद्यालयांमध्ये निम्न कृषि शिक्षणांतर्गत तीन वर्षाचा कायम विना अनुदानित तत्वावर कृषि तंत्र निकेतन (Agriculture Polytechnic) हा पदविका अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये प्रथम वर्षाला जे विद्यार्थी प्रवेश घेतील त्यांना हा तीन वर्षाचा पदविका अभ्यासक्रम लागू राहील.

राज्यात चारही कृषि विद्यापीठांतर्गत च्या खाजगी कृषितंत्र निकेतन विद्यालयांमध्ये कायम विना अनुदानित तत्वावर निम्न कृषि शिक्षणांतर्गत तीन वर्षाचा कृषि तंत्र निकेतन (Agriculture Polytechnic) हा पदविका अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून सुरू करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शक तत्वे आणि निकष सोबतच्या **परिशिष्ट —'अ'** प्रमाणे राहतील.

शासकिय कृषि तंत्र विद्यालये पुढील आदेशापर्यंत पूर्वीप्रमाणेच कार्यरत राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

भा.देवरे

**( भाग्यश्री देवरे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति:

मा.राज्यपाल-नि-कुलपती यांचे सचिव, राजभवन, मुंबई

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम. विभाग, मंत्रालय, मुंबई

सचिव (पदुम.), कृषि व पदुम. विभाग, मंत्रालय, मुंबई

सचिव (ग्राम विकास विभाग), मंत्रालय, मुंबई

सचिव (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण), शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे

कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक :-

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

आयुक्त, कृषि / पशुसंवर्धन /मत्सव्यवसाय /दुग्धव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, पुणे

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

महालेखापाल, महाराष्ट्र-१ / २ (लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर

महालेखापाल, महाराष्ट्र-१ / २ (लेखा व अनुज्ञेयता ) मुंबई/नागपूर

सर्व कृषि तंत्र विद्यालये (संबंधित विद्यापीठांमार्फत)

सर्व उप सचिव/ अवर सचिव / कार्यासन अधिकारी ,कृषि व पदुम. विभाग, मंत्रालय, मुंबई